| MHSN060010942022 | **म.सं.कौ.हिं.का.अर्ज : ४८/२०२२**<br>सौ. जियापरवीन नाजिर शेख<br>विरुध्द<br>श्री. नाजिर अन्वर शेख |
|---|---|

**निशाणी ५ खालील आदेश**

१. अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ च्या कलम २३ नुसार अंतरिम आदेश पारित करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. तिचे असे कथन आहे की, तिने वरील कायद्याच्या कलम १२, १८, १९, २०, व २२ प्रमाणे अर्ज दाखल केला असून सदरचा अर्ज प्रलंबित आहे. तो अर्ज निकाली काढण्यासाठी बराच कालावधी लागणार आहे. जाबदार हे सत्वर काम चालवणेस टाळाटाळ करुन अर्जदारांना त्यांचे न्यायहक्कापासून वंचित ठेवतील तसेच अर्जदार व तिच्या कुटुंबियांवर दबावतंत्र वापरुन त्यांना त्रास देणेचा प्रयत्न करुन अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार करतील अशी अर्जदारांना साधार भिती आहे. त्यामुळे तिने अंतरिम आदेश पारित करण्यासाठी विनंती केली आहे.

२. अर्जदारच्या कथनांनुसार तिचा विवाह जाबदार क्र.१ सोबत दिनांक १२/१०/१९९१ रोजी मुस्लीम धर्मशास्त्रानुसार व रितीरिवाजाप्रमाणे हॉटेल महाराष्ट्र डिलक्स, मिरज येथे झालेला आहे. अर्जदार हिचे शिक्षण एस.वाय.बी.ए. पर्यंत झालेले आहे. जाबदार हे अर्जदाराचे सख्खे आत्तेभाऊ आहेत. लग्नानंतर अर्जदार ही जाबदाराकडे मिरज येथे नांदण्यास गेली. तथापि लग्नाच्या पहिल्याच जाबार यांनी अर्जदारांना त्यांचे अन्य एका मुलीबरोबर प्रेमसंबंध असल्याचे तसेच त्याच्या आईवडीलांच्या इच्छेखातीर अर्जदाराशी लग्न केल्याचे सांगितले. त्यामुळे अर्जदार हिला मोठा मानसिक धक्का बसला. तरी देखील अर्जदार ही जाबदार व त्याच्या आईवडीलांची अतिशय प्रेमळपणे सेवाशुश्रुणा करीत होती. सदर लग्नसंबंधातून अर्जदार यांना जाबदारांपासून दि.१२/१०/१९९२ रोजी निशात ही मुलगी झाली. त्यावेळी अर्जदार व मुलगी निशात हिला पाहण्यासाठी जाबदार गेले नाहीत. त्यानंतर मुलगी निशात तीन महिन्यांची असताना अर्जदार पुन्हा सासरी आल्या. त्यानंतर सन १९९४ मध्ये अर्जदारांनी जाबदारापासून पुन्हा दिवस

गेलेबाबत सांगितले असता जाबदार यांनी अर्जदार यांना भावनिक धमकी देऊन अर्जदार यांना गर्भपात करुन घेण्यास सांगितले. तथापि जाबदार अर्जदार व मुलगी निशात कडे दुर्लक्ष करु लागले. त्यामुळे अर्जदाराचे प्रकृतीवरही परिणाम होऊ लागला. जाबदाराच्या गैरवर्तनाबाबत अर्जदाराचे आईवडीलांनी जाबदाराकडे विचारणा केली असता जाबदार याने "मला तुमच्या मुलीमध्ये इंटरेस्ट नाही व मी माझे मर्जीचा मालक आहे, मला कोणीही जबरदस्ती केलेले आवडत नाही” असे सांगून तेथून निघून गेला. त्यामुळे अर्जदाराचे आईवडीलांनी २०/११/१९९४ रोजी अर्जदार हिला मुलीसह माहेरी आणले. त्यानंतर अर्जदार सुमारे ३–४ वर्ष माहेरी राहिली. त्यानंतर सन १९९७ मध्ये जाबदाराच्या आईवडीलांचा मान ठेवून अर्जदार ही पुन्हा सासरी नांदणेस आली. त्यानंतर जाबदार व त्यांच्या वडीलांमध्ये मतभेद निर्माण झाल्यामुळे सन १९९७ मध्ये जाबदार बाहेर राहू लागले. त्यानंतर जाबदार यांनी अर्जदार हिचे सहमतीशिवाय सलमा शेख हिचे बरोबर दुसरे लग्न केले. हे समजल्यानंतर अर्जदार यांचे मनावर मोठा मानसिक आघात होऊन त्यांना रक्तदाबाचा त्रास सुरु झाला. अर्जदार हिने तिचेकडे दुर्लक्षित करण्याचे कारण विचारले असता जाबदार यांनी तिला अपमानित केले. त्यानंतर सन २००६ मध्ये जाबदार याने रेश्मा शेख हिचेशी तिसरे लग्न केले. अशाप्रकारे जाबदार याने अर्जदाराचे संमतीविना दुसरा व तिसरा विवाह केलेला आहे. जाबदार हे अर्जदार हिला कधीही फिरण्यासाठी, देवधर्मासाठी बाहेर घेऊन गेलेले नाहीत. तसेच अर्जदार यांना त्यांच्या सास–यांनी सप्टेंबर–२०२१ मध्ये ग्रॅन्ड व्हयू सोसायटी, कुपवाड रोड, मिरज येथे राहण्याकरिता फ्लॅट घेऊन दिलेला होता. जाबदार यांनी सुरुवातीपासूनच अर्जदाराकडे दुर्लक्ष केलेले आहे तसेच तिला आर्थिक लाभापासून वंचित ठेवले आहे. अर्जदार यांना पूर्णपणे त्यांचे आईवडील व सासू सासरेवर अवलंबून रहावे लागत असल्यामुळे त्याबाबत जाबदार यांचेकडे विचारणा केल्यानंतर सन २०२० पासून जाबदार हे नाममात्र रक्कम रु.५,०००/– अर्जदारांचे बँक खातेवर जमा करीत होते. तथापि, एप्रिल–२०२२ पासून तीही रक्कम जमा करणे बंद करुन जाबदार यांनी अर्जदार यांचेवर आर्थिक हिंसाचार केलेला आहे. सध्या अर्जदार यांचे पोटापाण्याचे हाल होत असून त्यांना रक्तदाबाच्या त्रासामुळे कोणताही कामधंदा होत नाही. अशाप्रकारे कोणत्याही सबळ कारणाअभावी जाबदार यांनी अर्जदार यांचेवर कौटुंबिक हिंसाचार केला आहे. तसेच जाबदार यांनी दिलेल्या मानसिक, शारिरीक व अपमानास्पद वागणुकीमुळे अर्जदार यांचे मानसिक

खच्चीकरण होऊन त्यांचे संपूर्ण आयुष्य उध्वस्त केले आहे. तसेच अर्जदार यांची त्यांच्या राहणीमानाप्रमाणे राहण्याची व्यवस्था करणे व त्यांचा उदरनिर्वाह करणेचे देखील जाबदाराने टाळलेले आहे. त्यामुळे अर्जदार हिने तिच्या न्यायहक्काच्या मागणीबाबत जाबदार यांना दि. २२/०३/२०२२ रोजी वकीलांमार्फत नोटीस पाठविली असता जाबदार यांनी त्यांच्या उत्तरी नोटीसीमध्ये अर्जदार व जाबदार यांचे नवराबायकोचे संबंध संपुष्टात आल्याचे व जाबदार यांनी अर्जदार हिला तलाक दिलेचे काल्पनिक चित्र पश्चात बुध्दीने उभे करुन अर्जदाराची जबाबदारी टाळणेचा प्रयत्न केला. त्यातच अर्जदार हिचे वडील दि. २४/०३/२०२२ रोजी मयत झाल्याचे जाबदार यांना माहिती असून देखील त्यांनी अर्जदार हिला आर्थिक आधार दिलेला नाही. जाबदार हे दांडगट प्रवृत्तीचे असून त्यांचेपासून अर्जदार व तिचे कुटुंबीय तसेच स्नेही यांचे जिवास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच जाबदार हे वारंवार अर्जदार हिचे नातेवाईकांना फोन करुन धमकी देत असून अर्जदार हिचे मैत्रीणींवर देखील दबाब टाकत आहे. त्यामुळे जाबदार यांनी अर्जदार व त्यांचे स्नेहींना कसल्याही प्रकारचा त्रास देवू नये याबाबत संरक्षणात्मक आदेश व्हावा, तिच्या राहणीमानाप्रमाणे तिची स्वतंत्र व्यवस्था व्हावी तसेच तिच्या उदरनिर्वाहाकरिता जाबदार यांचेकडून रक्कम रु.५,००,०००/– तसेच नुकसानभरपाई म्हणून रक्कम रु. २,००,००,००० /– मिळावेत अशी विनंती प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार हिने केली आहे.

३. जाबदार यांनी निशाणी १६ वर म्हणणे देवून अर्जास सक्त विरोध केला आहे. त्यात त्यांचे असे कथन आहे की, अर्जदार ही डिसेंबर १९९२ पासून जाबदारांचा त्याग करुन घर सोडून गेल्या आहेत व तेव्हापासून स्वतंत्र राहत आहेत. अर्जदार व जाबदार यांचा तलाक हा अर्जदाराच्या मागणीप्रमाणे व जाबदारांच्या संमतीने फेब्रुवारी १९९३ मध्ये झालेला आहे व तेव्हापासून अर्जदार या जाबदारापासून विभक्त राहत आहेत. त्यानंतर जवळजवळ ३० वर्षांनी अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला असून तो कायदयाने चालण्यास पात्र नाही. तसेच कौटुंबिक हिंसाचार कायदा हा दि.२६/१०/२००६ पासून अंमलात आला असल्यामुळे व त्यावेळी अर्जदार व जाबदार यांचे पतीपत्नीचे नाते अस्तित्वात नसल्यामुळे जाबदार यांनी अर्जदार यांचेवर आर्थिक, शारिरीक, मानसिक व कौटुंबिक हिंसाचार करणेचा प्रश्नच उदभवत नाही. तसेच

गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला रक्कम रु. १७,००,०००/– चा फ्लॅट देखील घेऊन दिला. तसेच त्यांनी तिला ५,०००/– रुपये प्रती महिना अशी मदत देखील केली आहे. अर्जदार ही स्वतःहून तिचे माहेरी निघून गेली आहे. अर्जदार हिचा ब्युटीपार्लरचा व्यवसाय असून तिला त्यापासून उत्पन्न मिळू शकते. त्यामुळे तिला पोटगीची आवश्यकता नाही. त्यामुळे अर्जदार यांचा अर्ज हा नामंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

**४.** अर्जदार यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण संचाचे अवलोकन केल्यानंतर खालील मुददे उपस्थित होतात. त्या मुद्दयांसोबत मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार मागणीप्रमाणे अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे काय ? | अंशतः होकारार्थी.... |
| २. | अर्जदार हिच्या विनंतीमध्ये मागणी केल्याप्रमाणे इतर अंतरिम आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | नकारार्थी.. |
| ३. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे... |

## कारणमिमांसा

### मुददा क्र.१ ते ३ बाबत –

**५.** सदर प्रकरण अर्जदारने जाबदार विरुद्ध कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम १२, १८, १९, २० व २२ अंतर्गत अर्ज दाखल केलेला आहे. सदर प्रकरण अर्जदाराने २०२२ साली दाखल केलेले आहे. त्यांनी निशाणी ५ प्रमाणे अंतरीम पोटगी मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

**६.** मुख्य अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदाराने तिच्या अंतरिम पोटगीच्या अर्जामध्येही तिच्यासाठी पोटगी मिळण्याची विनंती केलेली आहे. प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा अन्वये करण्यात आलेला आहे. प्रस्तुतचा कायदा सामाजिक स्वरुपाचा कायदा आहे. याचा उद्देश महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण व्हावे तसेच तिला पोटगीची तसेच रहाण्याची व इतर आवश्यक गरजांची पुर्तता असा विस्तृत स्वरुपाचा आहे.

७. अर्जदाराच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, अर्जदार हिचा जाबदाराशी सन १९९२ साली विवाह झालेला आहे. सदर लग्नसंबंधातून अर्जदार हिला एक मुलगी आहे. त्यानंतर त्यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, जाबदार क्र.१ याने परत दोन लग्ने केली. जाबदार हा अर्जदार हिला तिच्या राहणीमानाप्रमाणे कसल्याही प्रकारची आर्थिक मदत करत नाही. जाबदार हा हॉटेल व्यवसाय चालवितो. त्यापासून त्याला दरमहा ४० ते ५० लाख रुपये उत्पन्न मिळते. तसेच जाबदार याला इतर व्यवसायामधून देखील उत्पन्न मिळते. तसेच त्याचे ४ एकरमध्ये फार्म हाऊस असून त्याचेकडे महागडया गाडया आहेत. त्यामुळे जाबदार हा अर्जदाराच्या मागणीप्रमाणे सहज पोटगी देऊ शकतो. त्यामुळे अर्जदाराचा सदरचा अर्ज मंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली.

८. जाबदाराच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, अर्जदार व जाबदार यांचे लग्न संपुष्टात आलेले आहे. अर्जदार व जाबदार क्र. १ हे गेल्या २९–३० वर्षापासून एकत्र कुटुंबात राहत नाहीत. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण हा कायदा सन २००६ पासून अस्तित्वात आलेला आहे. त्यामुळे सदर कायदा पुर्वलक्षित लागू होणार नाही. जाबदार हा आज रोजी अर्जदार हिला देणे लागत नाही. जाबदार याने अर्जदार हिला राहण्यासाठी १४,००,०००/– रुपयांचा फ्लॅट दिलेला आहे. तसेच तिच्या खात्यामध्ये जाबदार याने वेळोवेळी रक्कम पाठविलेल्या आहेत. त्यासंदर्भात अर्जदार हिचा बँक खाते उतारा प्रकरणामध्ये दाखल आहे. तसेच त्यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, अर्जदार ही शितल ब्युटी पार्लरचा व्यवसाय करते. त्यापासून तिला उत्पन्न मिळते. तसेच तिच्यावर कुणाचीही जबाबदारी अवलंबून नाही. त्यामुळे ती तिचा उदरनिर्वाह सहजपणे करु शकते. तसेच जाबदार यांनी आतापर्यंत अर्जदार हिला रु.५,०००/– प्रति महिना खर्च दिलेला आहे. जाबदार यांनी अर्जदार हिचेवर गेल्या ३० वर्षात कधीही कौटुंबिक हिंसाचार केला नाही. तसेच अर्जदार हिने सुध्दा त्याबाबत कुठेही तक्रार केलेली नाही. त्यामुळे अर्जदार हिने कायदयाचा गैरफायदा घेऊन जाबदार यांचे विरुध्द खोटे प्रकरण दाखल केले आहे. त्यामुळे अर्जदार हिचा अर्ज नामंजूर व्हावा अशी त्यांनी विनंती केली.

९. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाची व दाखल कागदपत्रांची पाहणी केली. जाबदार याचे कथनानुसार त्याचे व अर्जदार हिचे लग्नसंबंध संपुष्टात आलेले

आहेत. त्यामुळे कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण या कायदयाअंतर्गत अर्जदार हिला दाद मागता येणार नाही. परंतु, सदरहू बाब ही संपूर्ण पुराव्यानिशी सिध्द होईल. जाबदार याला अर्जदार हिचे त्याचेबरोबर सन १९९२ रोजी लग्न झाले होते ही बाब मान्य आहे. अर्जदार ही व्यथित व्यक्ती (Aggrieved person) या संज्ञेत बसते किंवा नाही हे पुराव्याअंती सिध्द होईल. जाबदार याचे कथनानुसार, तो आतापर्यंत अर्जदार हिला रु.५,०००/– महिना पुरवित होता. परंतु, अर्जदार हिच्या म्हणण्यानुसार तिला आवश्यक असणारी आर्थिक मदत जाबदार यांनी केली नाही. अर्जदार हिच्या नावाने फ्लॅट असल्याचे प्रथमतः प्रकरणात दाखल असलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. तसेच जाबदार यांनी अर्जदार हिला वेळोवेळी रकमा पाठविल्या होत्या, हे अर्जदार हिच्या बँक खात्याच्या उता–यावरुन दिसून येते. अर्जदार व जाबदार यांची कथने पाहिली असता तसेच त्यांनी दाखल केलेले संपत्ती व उत्तरदायित्वाचे प्रमाणपत्रावरुन प्रथमदर्शनी जाबदार यांनी अर्जदार हिला जरी आर्थिक मदत केली असली तरी त्यांच्या राहणीमानाच्या स्तरानुसार ती असल्याचे दिसून येत नाही. जाबदार यांच्या कथनानुसार अर्जदार ही ब्युटी पार्लरचा व्यवसाय करते व त्यापासून तिला उत्पन्न मिळते. तसेच जाबदार यांच्या वकीलांच्या कथनानुसार, प्रकरणात दाखल असलेल्या अर्जदाराच्या बँक खात्यावरुन सुध्दा तिची आर्थिक बाजू भक्कम असल्याचे दिसून येते. परंतु, अर्जदार ही ब्युटी पार्लरचा व्यवसाय करते याबाबत कुठलाही ठोस कागदोपत्री पुरावा आज रोजी न्यायालयासमोर नाही. त्यामुळे दाखल असलेल्या बँक खाते उता–यावरुन अर्जदार हिचे महिन्याचे उत्पन्न ठरविता येणार नाही. उलटपक्षी, अर्जदार हिचे म्हणण्यानुसार, जाबदार यांचे स्वतःचे ''मिरची हॉटेल'' आहे. तसेच जाबदार यांनी दाखल केलेल्या संपत्ती व उत्तरदायित्वाचे प्रमाणपत्रावरुन  तसेच जाबदार यांच्या वकीलांच्या युक्तीवादावरुन, जाबदार यांचेवर दोन कोटीपेक्षा जास्त कर्ज आहे व त्या कर्जापोटी त्यांना दरमहा ३,००,०००/– वर हप्ता भरावा लागतो. याचाच अर्थ जाबदाराचे उत्पन्न ही प्रथमदर्शनी चांगल्या स्वरुपात आहे असे दिसून येते. तसेच अर्जदार यांच्या वकीलांनी खालीलप्रमाणे न्यायनिवाडे दाखल केले.

**1. (2010) DMC 689, Delhi High Court**

*Master Anant Narayan Rai & Ors. Vs. Siddharth Rai & Ors.*,

**2. 2012(1) ALL MR 232, High Court Bombay (Nagpur Bench)**
*Mr. Harish Nandlal Gaba Vs. Smt. Monica Harish Gaba*

**3. (2014) DMC 106, (DB) (Bom.), Bombay High Court**
*Rachana Oswald Malhotra/D'silva Vs. Oswald D'silva @ amar*

**4. (2015) DMC 607 (Bom.), Bombay High Court**
*Om Prakash Puri Vs. Nandita Puri*

सदरहू न्यायनिवाडयांची पाहणी केली असता त्यामध्ये *पोटगी ठरविताना जाबदाराच्या राहणीमानानुसार अर्जदार हिला पोटगी दयावी* असे म्हटले आहे. जाबदार यांचे निश्चित उत्पन्न हे संपूर्ण पुरावा झाल्यानंतरच सिध्द होईल. तसेच जाबदार यांचा राहणीमानाचा स्तर कशाप्रकारचा आहे हे सुध्दा संपूर्ण संपरीक्षा झाल्यानंतरच सिध्द होईल. तथापि, आज रोजी अर्जदार हिने जाबदाराच्या उत्पन्नाबाबत इतर कुठलाही ठोस कागदोपत्री पुरावा न्यायालयासमक्ष आणला नाही. त्यामुळे महिन्याकाठी साधारण विचार करता जाबदार हा अर्जदार हिला पोटगी म्हणून दरमहा रु.१०,०००/– सहज देऊ शकतो. इतर बाबींचा विचार केला असता अर्जदार हिचेकडे आजरोजी कुठलेही उत्पनाचे साधन दिसून येत नाही. अर्जदार स्वतःचा उदरनिर्वाह करु शकत नाही ही बाब याक्षणी मान्य करावयास काहीही हरकत नाही. अर्जदार हिला अंतरीम पोटगीची आवश्यकता आहे असे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे अर्जदार ही अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे. कोणतीही भारतीय स्त्री आपले वैवाहिक जीवन खराब व्हावे या हेतूने कधीही केवळ आपल्या पतीकडून पोटगी मिळावी म्हणून त्याचे घर सोडून न्यायालयाचा दरवाजा ठोठावणार नाही.

**१०.** जाबदार यांची अर्जदाराला सांभाळण्याची कायदेशीर तसेच नैतिक व सामाजिक जबाबदारी आहे. जाबदाराने अर्जदाराच्या पालनपोषणाची तिच्या राहणीमानाच्या स्तरानुसार व्यवस्था केल्याचे आजरोजी दिसून येत नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी जाबदारांनी अर्जदाराचा आर्थिक हिंसाचार केल्याचे दिसून येते. अर्जदाराचे कथन, वकीलांचा युक्तीवाद व दाखल केलेले कागदपत्र लक्षात घेवून तसेच अर्जदाराचा राहणीमानाचा स्तर, यावरुन अर्जदार हिला महिन्याकाठी उदरनिर्वाहाकरीता रु.१०,०००/– पोटगी देणे योग्य होईल. तसेच जाबदार हे तिच्या कुटुंबियांवर दबावतंत्र वापरुन त्यांना त्रास देणेचा प्रयत्न करीत आहेत याबाबतचा कुठलाही प्रथमदर्शनी ठोस

पुरावा आज रोजी न्यायालयासमोर नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चे उत्तर अंशतः होकारार्थी व मुद्दा क्र.२ चे उत्तर नकारार्थी देऊन मुददा क्र.३ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो –

**आदेश**

१. जाबदार क्र.१ याने अर्जदार हिला दरमहा रु.१०,०००/– (दहा हजार रुपये) अंतरिम पोटगी मूळ अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दिनांक ०४/०६/२०२२ पासून पुढील आदेशापर्यंत द्यावी.

२. अर्जाचा खर्च रु.१,०००/– (एक हजार रुपये) जाबदार क्र.१ यांनी अर्जदार हिस द्यावा.

३. आदेशाची प्रत अर्जदाराला विनामुल्य देण्यात यावी.

NIRANJAN BALASAHEB CHAVAN
Digitally signed by NIRANJAN BALASAHEB CHAVAN
Date: 2023.03.06 17:41:08 +05'30'

मिरज.

**(नि. बा. चव्हाण)**

दिनांक : ०४/०३/२०२२

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, मिरज

न्यायालय क्र.४

*****

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Sou. A.C. Patil, (Grade-III) |
| Court | : | 4th Jt. Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Miraj |
| Date | : | 04/03/2023 |
| Order signed by the Presiding Officer | : | 04/03/2023 |
| Order uploaded on | : | 06/03/2023 |